# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## नागपूर मेट्रो फेज-II 25 के.व्ही.ओएचई लाईनच्या कार्याची सुरुवात



नागपूर: नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचे निर्माण कार्य सुरु असून, या प्रकल्पा अंतर्गत रीच 1A येथे ओव्हरहेड इलेक्ट्रिफिकेशन (OHE) कार्याची सुरुवात महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आली. खापरी ते एमआयडीसी दरम्यानचा हा भाग नागपूर शहराच्या विस्ताराला चालना देणारा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. या मार्गामुळे प्रवाशांसाठी अधिक चांगली प्रवासी सुविधा उपलब्ध होणार असून, प्रादेशिक संपर्क वाढविण्यात मदत होईल आणि नागपूरच्या सामाजिक-आर्थिक विकासाला गती मिळेल.

ओएचई चे कार्य केईसी इंटरनॅशनल लिमिटेड या कंपनीच्या वतीने करण्यात येत असून या वेळी महा मेट्रोचे संचालक (रोलिंग स्टॉक व सिस्टम्स) श्री. विनोद अग्रवाल, संचालक (स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग

व ऑपरेशन्स) श्री. अनिल कोकाटे, कार्यकारी संचालक (ट्रॅक्शन) श्री. रणजित देशमुख) व इतर महा मेट्रो व केईसीचे इतर अधिकारी उपस्थित होते.

यावेळी श्री. हर्डीकर यांनी मेट्रो अधिकाऱ्यांसोबत आढावा घेत प्रगतीपथावर असलेल्या प्रणाली संबंधित कामांचा आढावा घेत सर्व प्रलंबित कामे लवकर पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले.